**जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद**

**(उपचिटणीस शाखा)**

दुरध्वनी क्र.०२४७२-२२७३०१ **Email id:-** rdc1osmanabad@gmail.com फॅक्स क्र.०२४७२-२२८०१८

संदर्भ:-१. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८ /आरोग्य ५दिनांक १४ मार्च २०२०

२. मा. प्रधान सचिव , सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

३. या कार्यालयाचे आदेश क्रमांक उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६ दि. २९/०३/२०२०

---

जा.क्र.२०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६ दि. ०७/०४/२०२०

विषय:- उस्मानाबाद जिल्हयात करोना विषाणू (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत **जिल्हयातील सर्व किराणा दुकाने स.०७.०० ते ११.०० या कालावधीतच चालु ठेवणेबाबत**

**आदेश:-**

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक १ अन्वये जिल्हाधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजारावर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे.

त्याअर्थी उस्मानाबाद जिल्हयात करोना विषाणूचा प्रादुर्भाव (कोव्हिड १९) रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी रोखण्यासाठी उस्मानाबाद जिल्हयातील सर्व किराणा दुकाने **सकाळी ७.०० ते ११.०० या कालावधीतच चालु ठेवण्यात यावीत, असे आदेशित करण्यात येत आहे.**

या आदेशाची अंमलबजावणी होत असलेबाबत खात्री करुन त्याबाबतचा दैनंदिन अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं.) जि. प. उस्मानाबाद, पोलिस उपअधिक्षक (गृह) उस्मानाबाद, सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन उस्मानाबाद, जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्रशासन जि. का. उस्मानाबाद, सर्व तहसिलदार, सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सर्व मुख्याधिकारी नगर परिषद/नगरपंचायत जिल्हा उस्मानाबाद यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२० चे नियम ११ नुसार भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतुदीनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागु करण्यात येत आहे.

DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

7/4/20

(दिपा मुधोळ-मुंडे)

जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,

उस्मानाबाद

DISTRICT MAGISTRATE

OSMANABAD

P.T.O.

Scanned by CamScanner

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
**प्रतिलिपी, माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद
२. पोलिस अधिक्षक, उस्मानाबाद यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
३. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद.
४. जिल्हा शल्य चिकीत्सक, उस्मानाबाद
५. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. उस्मानाबाद
६. जिल्हा प्रशासन अधिकारी, न.पा.प्र.जि.का. उस्मानाबाद
७. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद
८. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा.पं./स्वच्छता व पाणीपुरवठा जि.प. उस्मानाबाद
९. उपविभागीय दंडाधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१०.तालुका दंडाधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
११. गट विकास अधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१२. मुख्याधिकारी, नगर पालिका, उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, लोहारा, मुरुम, भुम, परंडा, वाशी , कळंब यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

7/4/20

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANA AD

Scanned by CamScanner